# <u>रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड</u>
# <u>यांच्या न्यायालयात</u>

**(पिठासीन अधिकारी सुभाष ल. फुले)**
सी.एन्.आर.क्र. एम् एच् आर जी०९०००७९३२०१८

सं. फौ. ख. क्र.**४२९/२०१८** **निशाणी क्रमांक १८/क**

**०१**. गुन्हा घडल्याची तारीख : नोटीस मिळाल्यानंतर पंधरा दिवसांपासून पुढे.

**०२**. फिर्याद दाखल केल्याचा दिनांक : **०६.१०.२०१८**.

**०३**. फिर्यादी : श्री. रविंद्र काशिनाथ तारू.
वय : ४३ वर्षे, धंदा : व्यापार,
राहणार : मुक्काम पोष्ट कोलाड,
तालुका : रोहा, जिल्हा : रायगड.

**०४**. आरोपीचे नाव वय व पत्ता : अजय लक्ष्मण जाडे,
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यापार.
प्रोप्रायटर साई विभूती एंटरप्रायझेस,
कार्यालयीन पत्ता : गाळा क्रमांक ०४,
प्रभाकर हॉटेल जवळ, मुक्काम पोष्ट कोलाड,
तालुका : रोहा, जिल्हा : रायगड.
मुळ राहणार : पडवण, पोष्ट : टोकार्डे,
तालुका : तळा, जिल्हा : रायगड.

**०५**. <u>आरोपीस सांगावयाचे अपराधाचे विवरण</u> :

तुम्ही फिर्यादीच्या नावे तुमच्या सारस्वत बॅंक, शाखा खांदा कॉलनी नवीन पनवेल येथील खाते क्रमांक ४५०१००१००००००५४ वरील दिनांक **२९.०८.२०१८** रोजीचा धनादेश क्रमांक **००४००५** रक्कम रुपये १,००,०००/- (रक्कम रूपये एक लाख मात्र) फिर्यादीचे कर्ज / देणे फेडण्याची कायदेशीर जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सदर धनादेश वटेल अशी हमी देवून दिला, फिर्यादीने सदर धनादेश त्याचे खाते असलेल्या स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा रोहा येथे वटण्यासाठी जमा केला असता धनादेश दिनांक **३०.०८.२०१८** रोजी 'अपुरा निधी' या कारणास्तव न वटता परत आला, फिर्यादीने विधीज्ञ श्री. एन्. जी. देशमुख यांच्या मार्फत दिनांक **०७.०९.२०१८** रोजीची नोटीस तुम्हाला त्याच दिवशी नोंदणीकृत पोष्टाने राहते घर व कार्यालयीन पत्यावर पाठवली, तुम्हाला नोटीस मिळाल्यापासून, तुम्ही पुढील पंधरा दिवसात धनादेशाची रक्कम फिर्यादीला देण्यास कसूर केला व त्याद्वारे चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये दंडनीय गुन्हा केला.

आणि मी याद्वारे तुमच्याविरूद्ध वरील गुन्ह्याकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

(आरोपीला अपराधाचे विवरण त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतले)

**०६**. आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न १ : तुम्हाला आरोपपत्र व सोबतची संपुर्ण कागदपत्रे मिळाली काय?

उत्तर : होय.

प्रश्न २ : आता तुम्हाला वाचून व समजावून सांगीतलेले अपराधाचे विवरण समजले काय?
उत्तर : होय.

प्रश्न ३ : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर : मला गुन्हा कबुल नाही.

---**स्वाक्षरी**---
(आरोपीची सही)

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम्. एच्. आर. जी. ०००९-२१२५)**
**प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : २७.११.२०१८.**